# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान काळातील चौथा रविवार

## सायंप्रार्थना

*महत्वाची सूचना ः सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

गीत ः पुनरूत्थान गीत

प्रतिगीत १: जिथे ख्रिस्त देवाच्या उजवीकडे बसलेला आहे तिथल्या वरील गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करा, आल्लेलुया.

स्तोत्र ११० : १ - ५, ७

**मा**झ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बैस.

**प**रमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

**तु**झ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

**प**रमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे
तू युगानुयुग याजक आहेस.

**तु**झ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

**मा**र्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

**पि**ता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: जिथे ख्रिस्त देवाच्या उजवीकडे बसलेला आहे तिथल्या वरील गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करा, आल्लेलुया.

********

प्रतिगीत २: सरळ मनाच्या लोकांसाठी तो अंधारात प्रकाशात उदय पावलेला आहे, आल्लेलुया.

स्तोत्र ११२

**प**रमेश्वराचे स्तवन करा.
जो मनुष्य परमेश्वराचे भय धरितो
आणि ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे तो धन्य!
त्याची संतती पृथ्वीवर पराक्रमी होईल;
सरळ जनांचा वंश आशीर्वादयुक्त होईल.

**ध**नसंपदा त्याच्या घरी असते;
त्याचे नीतिमत्त्व सर्वकाळ टिकते.
सरळ जनांस अंधकारात प्रकाश प्राप्त होतो.
त्याच्याठायी कृपा, दया व न्याय ही आहेत.

**जो** मनुष्य दया करितो व उसने देतो
त्याचे कल्याण होते;
तो न्यायाने आपले व्यवसाय करील.
तो कधीही ढळणार नाही;
नीतिमानाचे स्मरण सर्वकाळ राहील.

**तो** वाईट बातमीला भिणार नाही;
त्याचे मन परमेश्वरावर भाव ठेवून अढळ राहते.
त्याचे मन स्थिर असते,
आपल्या शत्रूंची गत आपल्या इच्छेप्रमाणे झालेली पाहीपर्यंत तो भिणार नाही.

**त्या**ने सढळ हाताने गरिबांस दान दिले आहे;
त्याचे नीतिमत्त्व सर्वकाळ राहील.
त्याचा सन्मानपूर्वक उत्कर्ष होईल.

**हे** पाहून दुर्जन खिन्न होईल;
तो दातओठ खाईल पण विरघळून जाईल.
दुर्जनांची इच्छा नष्ट होईल.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २: सरळ मनाच्या लोकांसाठी तो अंधारात प्रकाशात उदय पावलेला आहे, आल्लेलुया.

*********

प्रतिगीत ३: आल्लेलुया, विजय, गौरव आणि सामर्थ्य देवाचे आहे, आल्लेलुया.

प्रकटी १९ :१ - २, ५ - ७

'आल्लेलुया', तारण, गौरव व सामर्थ्य ही आमच्या देवाची आहेत; (प्र.आल्लेलुया)

कारण 'त्याचे न्याय निर्बंध सत्याचे' व 'नीतीचे' आहेत. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया अहो, आमच्या देवाची भीती बाळगणाऱ्या
सर्व लहानथोर दासांनो, त्याचे स्तवन करा, (प्र. आल्लेलुया)

'आल्लेलुया', कारण सर्वसमर्थ आमचा 'प्रभू' देव
ह्याने राज्य हाती घेतले आहे. (प्र. आल्लेलुया)

आपण आनंद व उल्हास करू व त्याचे गौरव करू; प्र.आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया, कारण कोकराचे लग्न निघाले आहे,
आणि त्याच्या नवरीने स्वत:ला सजविले आहे. प्र.आल्लेलुया (आल्लेलुया).

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** आल्लेलुया, विजय, गौरव आणि सामर्थ्य देवाचे आहे, आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** इब्री १०: १२ - १४

पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पून हा देवाच्या उजवीकडे बसला आहे; आणि तेव्हापासून आपले वैरी आपले पदासन होईपर्यंत वाट पाहात आहे. कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: तो शिमोनाच्या दृष्टीस पडला आहे.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात आणि मी, त्यांचा प्रभू, त्यांना ओळखतो, आल्लेलुया.

**मरियेचे स्तोत्र:** (लूक १:४६-५५)

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.'

त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'त्याने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात आणि मी, त्यांचा प्रभू, त्यांना ओळखतो, आल्लेलुया.

## विनंत्या

प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

आपण परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याने येशूला मरणातून उठविले आणि आपल्या उजवीकडे उच्चपदी विराजमान केले. प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

हे पित्या, क्रुसावरील विजयोत्सवाद्वारे तू येशूला पृथ्वीपासून उंच केलेस. - तो आता सर्व मनुष्यांना त्याच्याकडे आकर्षूण घेवो. प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या ख्रिस्तसभेवर पवित्र आत्म्याचा वर्षाव कर. - तिला संपूर्ण मानवजातीच्या ऐक्याचे चिन्ह बनव. प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

हे बापा, पाणी आणि पवित्र आत्मा यांद्वारे तू सर्वांना जन्म दिलेला आहे. - सार्वकालिक जीवनात प्रवेश करीपर्यंत त्यांना आपल्या बाप्तिस्म्याशी एकनिष्ठ ठेव. प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

तुझ्या पुत्राच्या गौरवाद्वारे दु:खितांचे सांत्वन कर, बंदिवानांना मुक्त कर, आजाऱ्यांना बरे कर, - तुझ्या अद्भुत कृपादानांबद्दल संपूर्ण जग उल्हास करो.प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

तुझ्या मृत श्रद्धावंतांचे तू ख्रिस्ताच्या शरीर आणि रक्ताने पोषण केलेस. - त्यांना पुनरूत्थानाच्या दिवशी त्याच्या वैभवात सहभागी कर. प्रतिसाद: प्रभो, ख्रिस्ताच्या गौरवाद्वारे तुझ्या लोकांचे सरंक्षण कर.

आमच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना

सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, आमचा मेंढपाळ ख्रिस्त ह्याच्याकडून आम्हाला शक्ती दे व तुझ्या संतांमध्ये समावेश करण्यास आम्हाला स्वर्गाकडे ने. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्व काळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.
प्रतिसाद: आमेन.